# मे. एस. डी. साटम ॲण्ड कंपनी

चार्टर्ड अकौंटंट्स

सी-२००३, स्टेशन प्लाझा प्रिमायसेस को-ऑप.सो.लि., स्टेशन रोड, भांडूप (पश्चिम), मुंबई-४०० ०७८

दुरध्वनी – ९८२०४९६०८१


दि. ०६/०६/२०२२

प्रति,

मा.मुख्य कार्यकारी आणि सचिव,
दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशन लि.
भारतीय क्रीडा मंदिर, नायगांव-वडाळा रोड,
मुंबई - ४०० ०३१.

**विषय : ३१ मार्च,२०२२ या आर्थिक वर्षाअखेरचा वैधानिक लेखापरीक्षण अहवाल सादर करणेबाबत**

दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशन लि. या संस्थेच्या हिशेबांचे लेखापरीक्षणावेळी फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांकडून पुरवलेल्या माहितीच्या आधारे (तोंडी व लेखी) लेखापरीक्षण करण्यात आले आहे. वर नमूद कालावधीत संस्थेचा ताळेबंद व आयव्यय पत्रकांचे परीक्षण करण्यात येवून त्यात आढळलेली निरीक्षणे व विसंगती तसेच फेडरेशनचा व्यवहार इ. लेखापरीक्षण अहवालात हरकती तथा साधारण शेऱ्यामध्ये नमूद करण्यात आल्या आहेत.

संस्थेचे दि. १ एप्रिल, २०२१ ते ३१ मार्च, २०२२ या कालावधीचे वैधानिक लेखापरीक्षण पूर्ण करण्यात येवून अहवाल पुढील माहिती पत्रकांसहित सोबत जोडण्यात आला आहे.

१. आयव्यय पत्रक आणि ताळेबंद पत्रक

२. लेखापरीक्षकाची प्रमाणपत्रे, फेडरेशनच्या सद्यस्थिती बद्दल थोडक्यात प्रस्तावना व टिप्पणी, लेखापरीक्षण हरकती, निरीक्षणे, सर्वसाधारण शेरे व फेडरेशनच्या इतर अनिवार्य तपशीलांसह लेखापरीक्षकांचा अहवाल.

३. नमुना क्र.१ मध्ये लेखापरीक्षण मेमोरँडम

सदर अहवालात नमूद केलेल्या दोषांची पूर्तता तसेच दिलेल्या सूचनांची फेडरेशनने अंमलबजावणी करुन महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम ८२ व नियम ७३ प्रमाणे 'ओ' नमुन्यात संचालक मंडळाच्या ठरावासह सदर अहवाल मिळालेपासून ३ महिन्यांचे आत मा.निबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयास न चुकता सादर करावा, ही विनंती.

आपला आभारी,

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

(चार्टर्ड अकौंटंट संतोष साटम)
(प्रोप्रायटर)
स.क्र. १०४९०४
पॅनल नं. १७२५७

ठिकाण : मुंबई
तारीख : ०६.०६.२०२२

# स्वतंत्र लेखापरीक्षकांचा अहवाल

**नमुना क्र. एन-२**
**[महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१(५ब) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ६९(३) पहा]**

प्रति,

मा.मुख्य कार्यकारी आणि सचिव,
दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशन लि.
भारतीय क्रीडा मंदिर, नायगांव-वडाळा रोड,
मुंबई - ४०० ०३१.

**वैधानिक लेखापरीक्षकाचा आर्थिक हिशेब पत्रकांवर अहवाल**

१. दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँकेच्या फेडरेशन लि. या संस्थेच्या दि. ३१ मार्च,२०२२ अखेरच्या ताळेबंद व आयव्यय पत्रकासहीत हिशेबपत्रकांचे लेखापरीक्षण आम्ही पूर्ण केले असून दि. १ एप्रिल,२०२१ ते ३१ मार्च,२०२२ या कालावधीत लेखापरीक्षण केलेल्या हिशेबपत्रकात महत्त्वपूर्ण हिशेबविषयक धोरणे आणि अन्य स्पष्टीकरणयुक्त माहितीचा सारांश समाविष्ट करण्यात आला आहे.

**आर्थिक हिशेब पत्रकांबाबत व्यवस्थापनाची जबाबदारी**

२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० आणि त्या अंतर्गत तयार केलेल्या नियमांनुसार ही आर्थिक हिशेबपत्रके तयार करण्याची जबाबदारी व्यवस्थापनावर आहे. या जबाबदाऱ्यांमध्ये फसवणूक वा चुकीमुळे महत्त्वाच्या गैरविधानांमधून मुक्त असलेली आर्थिक हिशेबपत्रके बनविण्याशी निगडीत असलेली अंतर्गत नियंत्रणाची रचना, अंमलबजावणी आणि देखभाल इ.चा समावेश आहे.

**लेखापरीक्षकाची जबाबदारी**

३. आमच्या लेखापरीक्षणाच्या आधारे या आर्थिक हिशेबपत्रकांवर मत व्यक्त करण्याची जबाबदारी आमची आहे. आम्ही भारतीय लेखा परीक्षकांच्या चार्टर्ड अकौंटंट्सना लागू मानकांनुसार आणि महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यांतर्गतील तरतूदींच्या अधीन राहून आमचे लेखापरीक्षण केले आहे. सदर मानांकनानुसार आम्ही नैतिक धोरणांचे पालन करणे व संस्थेची आर्थिक हिशेबपत्रके महत्त्वाच्या गैरविधानांपासून मुक्त आहेत की नाहीत याबाबत वाजवी खात्री करुन आमच्या लेखापरीक्षणाचे नियोजन आणि पालन करणे जरुरीचे आहे.

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI

४. आर्थिक हिशेबपत्रकात नमूद रक्कमा व त्यांचे सादरीकरण यासंदर्भात लेखापरीक्षण पुरावे मिळविण्यासाठी एक विशिष्ट कार्यपद्धत लेखापरीक्षणात समाविष्ट असते. ही निवडलेली कार्यपद्धत लेखापरीक्षकाच्या मतांवर आधारित असून त्यात हिशेबपत्रकात नमूद फसवणूक वा चूकीमुळे झालेल्या महत्त्वाच्या गैरविधानांच्या जोखमीच्या मूल्यांकनाचा समावेश आहे. परिस्थितीनुसार लेखापरीक्षणाची कार्यपद्धत ठरवताना, लेखापरीक्षक संस्थेची हिशेबपत्रके तयार करतेवेळी वा त्याच्या सादरीकरणाशी निगडीत अंतर्गत नियंत्रण यंत्रणावर अवलंबून राहतात. लेखा परीक्षणामध्ये हिशेबांच्या धोरणांची योग्यता आणि व्यवस्थापनाने केलेल्या हिशेबांच्या अंदाजपत्रकाच्या वाजवीपणाचे मूल्यांकन तसेच आर्थिक हिशेबपत्रकांच्या एकूण सादरीकरणाचे मूल्यांकन यांचा समावेश आहे.

५. आम्हांस विश्वास आहे की, लेखापरीक्षणासाठी आम्ही मिळविलेला पुरावा आमच्या लेखापरीक्षणाला आधार देण्यासाठी पुरेसा व योग्य आहे.

मत

६. आमच्या मते आणि आम्हाला मिळालेल्या माहितीनुसार आणि आम्हांला देण्यात आलेल्या स्पष्टीकरणानुसार सदर हिशेबपत्रके व त्यातील मुद्दे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ आणि इतर लागू असलेले कायदे व निबंधकाकडून जारी करण्यात आलेल्या परिपत्रकानुसार भारतात सर्वसाधारणपणे स्वीकारलेल्या हिशेब तत्त्वांनुरुप संस्थेला आवश्यक असलेल्या पद्धतीनुसार वास्तववादी व योग्य स्वरुप दर्शवितात.

(*i*) ताळेबंदाच्या बाबतीत दि. ३१ मार्च,२०२२ पर्यंत संस्थेच्या कारभाराची स्थिती;

(*ii*) आयव्यय पत्रकाच्या बाबतीत दि. ३१ मार्च, २०२२ अखेर खर्चापेक्षा जास्त असलेले उत्पन्न.

**इतर कायदेशीर आणि नियामकीय बाबींवर अहवाल:**

७. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या तरतूदीनुसार ताळेबंद आणि आयव्यय पत्रक तयार करण्यात आले आहे.

**८. आम्ही पुढीलप्रमाणे अहवाल सादर करतो की,**

(अ) आमचे ज्ञान आणि विश्वासानुसार आमच्या लेखापरीक्षणासाठी आवश्यक असलेली सर्व माहिती व स्पष्टीकरण आम्हांला मिळालेले असून ते समाधानकारक आहे.

(ब) आमच्या मते आम्ही पुस्तकांच्या केलेल्या परीक्षणावरुन असे दिसून येते की, फेडरेशनने कायद्यास अनुसरुन योग्य हिशोबाची पुस्तके राखून ठेवलेली आहेत आणि आम्हाला आमच्या लेक्षापरीक्षणाकरिता फेडरेशनकडून पुरेशी व योग्य विवरणपत्रके प्राप्त झालेली आहेत.

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

(क) आमच्या मते व आम्हाला देण्यात आलेल्या माहितीनुसार फेडरेशनला देय असलेल्या रक्कमेत वा खर्चामध्ये कोणतीही महत्वाची अयोग्य कृती वा अनियमितता नाही.

(ड) आमच्या सर्वोत्तम माहितीसाठी आणि आम्हाला देण्यात आलेल्या खुलाशानुसार आमच्या निदर्शनास आलेले फेडरेशनचे व्यवहार हे फेडरेशनच्या अधिकार कक्षेत आहेत.

(इ) या अहवालात नमुद ताळेबंद आणि आयव्यय पत्रक हे हिशोबी पुस्तकांशी आणि विवरण पत्रकांशी जुळत आहेत.

फेडरेशनला सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी 'अ' लेखापरीक्षण वर्ग बहाल करण्यात आला आहे.

**मे. एस. डी. साटम ॲण्ड कंपनी,**
सनदी लेखापाल
संस्था नोंदणी क्र. ११८३०२ डब्ल्यू

**(चार्टर्ड अकौंटंट संतोष साटम)**
(प्रोप्रायटर)
स.क्र. १०४९०४
पॅनल नं. १७२५७

ठिकाण : मुंबई
तारीख : ०६.०६.२०२२

## नमुना क्र. १

## लेखापरीक्षण मेमोरँडम (सर्व प्रकारच्या संस्थांसाठी)

### भाग - १

| | | |
|---|---|---|
| संस्थेचे नांव | : | दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशन लि., मुंबई |
| संपूर्ण नोंदणीकृत पत्ता | : | भारतीय क्रीडा मंदिर, ४ था मजला, नायगांव-वडाळा रोड, मुंबई - ४०० ०३१. |
| तालुका किंवा गट | : | मुंबई - ४०० ०३१. |
| जिल्हा | : | मुंबई |

| | | |
|---|---|---|
| नोंदणी क्रमांक | बीओएम/जीएनएल/८/१९७९ | |
| | | (i) लेखापरीक्षण वर्ग 'अ' |
| नोंदणी दिनांक | ०९ मार्च, १९७९ | |
| | | (ii) शेवटच्या तीन लेखापरीक्षण दरम्यान दिलेले लेखापरीक्षण वर्ग 'अ' |
| संस्थेचे कार्यक्षेत्र | महाराष्ट्र | |
| शाखा, आगार आणि दुकानांची संख्या (स्वतंत्र संख्या द्या) | | नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | लेखापरीक्षण माहिती | | | |
| | (i) लेखापरीक्षण करणाऱ्या अधिकाऱ्याचे संपूर्ण नाव, हुद्दा व मुख्यालय | | मे. एस. डी. साटम ॲण्ड कंपनी सनदी लेखापरीक्षक | |
| | (ii) सध्याचा लेखापरीक्षणाचा कालावधी | | ०१.०४.२०२१ ते ३१.०३.२०२२ | |
| | (iii) संबंधीत तारखा : | (१) लेखापरीक्षणास सुरुवात केली. | | १२.०५.२०२२ |
| | | (२) लेखापरीक्षण पूर्ण झाले. | | ०४.०६.२०२२ |
| | | (३) लेखापरीक्षण मेमो सादर केला. | | ०६.०६.२०२२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २. | सभासदत्व : | | | |
| | (i) सभासद संख्या | (अ) व्यक्तिगत : | (i) सर्वसाधारण<br>(ii) नाममात्र<br>(iii) सहयोगी | - निरंक<br>- निरंक<br>- निरंक |
| | | (ब) संस्था | | -- |
| | | (क) इतर | **तपशील** | **क्र.** |
| | | | जिल्हा/विभागीय सहकारी बँकांच्या असोसिएशन्स | १८ |
| | | | नागरी सहकारी बँका | ४७३ |
| | | इतर सभासद असल्यास त्यांचा तपशील द्या | सहयोगी सभासद बँक | ०१ |
| | | | **एकूण** | ४९२ |

| | | |
|---|---|---|
| (ii) | नवीन सभासदांना विधिवत प्रवेश मिळाला आहे का? त्यांनी प्रवेश शुल्क भरले आहे का? | -लागू नाही- |
| (iii) | त्यांचे लेखी अर्ज नियमाप्रमाणे आहेत का? व ते व्यवस्थित भरण्यात आले आहेत का? | -लागू नाही- |
| (iv) | महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या नियम ३२ आणि ६५(i) अन्वये 'आय' नमुन्यात सभासदांची नोंदवही ठेवली आहे काय? | -लागू नाही- |

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

| | | | |
|---|---|---|---|
| | (v) | महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या नियम ३३ अन्वये 'जे' नमुन्यात सभासदांची यादी ठेवण्यात आली आहे का ? | ठेवली आहे. |
| | (vi) | मृत, काढून टाकलेल्या व राजीनामा दिलेल्या सभासदांच्या बाबतीत सभासद नोंदवहीत त्यांच्या नावापुढे त्यानुषंगाने योग्य ती नोंद केली आहे का ? | - होय - |
| | (vii) | राजीनामे नियमाप्रमाणे आहेत का आणि ते यथोचितरित्या स्वीकारण्यात आले आहेत का ? | परिशिष्ट जोडले आहे. |
| | (viii) | महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या नियम २५ अन्वये वारस नेमण्यात आले आहेत का ? व नियम २६ अन्वये त्याची नोंद सभासदांच्या नोंदवहीत यथोचितरित्या करण्यात आली आहे का ? | -लागू नाही- |
| ३. | भाग | | |
| | (i) | भागाकरिता आलेले अर्ज बरोबर आहेत का ? | |
| | (ii) | भागाची नोंदवही अद्ययावत लिहिली आहे का ? | |
| | (iii) | भागाच्या नोंदवहीतील नोंदी रोख पुस्तकातील नोंदीशी जुळतात का ? | |
| | (iv) | भागाची खतावणी अद्ययावत लिहीली आहे का ? | -लागू नाही- |
| | (v) | खतावणीतील एकूण भाग बाकी ताळेबंदातील भाग भांडवलाच्या रक्कमांशी जुळते आहेत का ? | |
| | (vi) | भागधारकांना त्यांनी घेतलेल्या सर्व भागाबद्दल भागपत्रे दिली आहेत का ? | |
| | (vii) | भागाचे हस्तांतरण (वर्ग) वा त्यांचा परतावा इ. कायदा, नियम व उपनिधी यातील तरतूदींनुसार झाला आहे का ? | |
| ४. | बाहेरील कर्ज : | | |
| | (i) | उपविधीमध्ये संस्थेने कर्ज घेण्याची मर्यादा किती आहे ? | |
| | (ii) | तिचे उल्लंघन झाले आहे का ? | -लागू नाही- |
| | (iii) | जर तिचे उल्लंघन झाले असेल तर सक्षम प्राधिकाऱ्यांकडून आवश्यक ती परवानगी घेण्यात आली आहे का ? | |
| ५. | सभा : | | |
| | (i) | तारखांचा तपशील देणे : | |
| | | (अ) वार्षिक सर्वसाधारण सभा | २९.०९.२०२१ |
| | | (ब) विशेष सर्वसाधारण सभा | --- |
| | (ii) | लेखापरीक्षा कालावधीत झालेल्या सभांची संख्या : | |
| | | (अ) संचालक मंडळ सभा | ५ |
| | | (ब) उपसमिती सभा | २ |
| ६. | दोष दुरुस्ती अहवाल : | | |
| | (i) | संस्थेने मागील लेखापरीक्षण अहवालावर दोषदुरुस्ती अहवाल सादर केला आहे का ? असल्यास ते सादर केल्याची दिनांक द्या. नसल्यास, ते न दिल्याबाबतची कारणे द्या. | होय. सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचा दोषदुरुस्ती अहवाल फेडरेशनने दिनांक १७.०९.२०२१ रोजी सादर केला आहे. |
| | (ii) | मागील लेखापरीक्षण अहवालात नमूद केलेल्या काही महत्त्वाच्या मुद्यांकडे संस्थेने दुर्लक्ष केले आहे का ? तसे असेल तर सर्वसाधारण अभिप्रायात ते नमूद करा. | लेखापरीक्षण अहवाल पहा. |

D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | **लेखापरीक्षा शुल्क** | | |
| | (i) | मागील लेखापरीक्षण शुल्क आकारणीचा तपशील देणे.<br>कोणत्या कालावधीसाठी लेखापरीक्षण शुल्क आकारले तो कालावधी नमूद करणे :<br>लेखापरीक्षा शुल्क भरल्याची तारीख, कोषागाराचे नाव आणि रक्कमेचा तपशील देणे. | ₹ ६,९८६/-<br>०१.०४.२०२० ते ३१.०३.२०२१<br><br>दि. २१.०३.२०२२ रोजी लेखापरीक्षण शुल्क अदा करण्यात आले.<br>चलन क्र. बीए-९६/२०२१-२२<br>हिशेबनीस : सौ. तनुजा गोळे |
| | (ii) | जर संस्थेने लेखापरीक्षा शुल्क भरले नसेल, तर थकीत लेखापरीक्षण शुल्काचा तपशील व सदर शुल्क न भरण्याची कारणे देणे. | -लागू नाही- |
| ८. | **अंतर्गत व स्थानिक लेखापरीक्षण :** | | |
| | (i) | अंतर्गत किंवा स्थानिक लेखापरीक्षण झाले असेल, तर ते कोणामार्फत झाले आहे ?<br>कोणत्या कालावधीसाठी केले गेले आहे ? व<br>त्याचा लेखापरीक्षण अहवाल संस्थेच्या दफ्तरी आहे का ? याची माहिती द्या. | मे. प्रितम नेवरेकर ॲण्ड असोसिएट्स, सनदी लेखापाल, अंतर्गत लेखापरीक्षक<br>२०२१-२२<br>हो, वार्षिक लेखापरीक्षण अहवाल सादर केला आहे. |
| | (ii) | वैधानिक लेखा परीक्षक व अंतर्गत लेखा परीक्षक यांच्यात योग्य समन्वय आहे का ? | -होय- |
| ९. | **(अ) कार्यकारी संचालक / व्यवस्थापक / सचिव** | | |
| | (i) | अधिकारी / व्यवस्थापकाचे नाव | सौ. सायली संजय भोईर<br>फेडरेशनच्या मुख्य कार्यकारी आणि सचिव |
| | (ii) | एकूण वेतन :<br>पद : | ₹ १,५३,८४१/- प्रति महिना<br>मुख्य कार्यकारी आणि सचिव |
| | (iii) | त्यांना अन्य भत्ते आणि सवलती उदा. विनामूल्य निवासगृहे आदी सेवा उपलब्ध केल्या असल्यास त्या लिहा. | मुख्य कार्यकारी व सचिव यांना करारानुसार दरमहा रु. १,५००/- भ्रमणध्वनी भत्ता अदा करण्यात येतो. |
| | (iv) | त्या संस्थेचे सभासद आहे का ते लिहा. | -नाही- |
| | (v) | जर ते सभासद असतील तर त्यांनी कर्ज घेतले आहे का ? किंवा त्यांना उधार उचल सवलती दिल्या आहेत का ? त्यांच्याकडील येणे रक्कम द्या त्यातील थकबाकी किती आहे ते लिहा. | -लागू नाही- |
| | (vi) | जर त्यांच्याकडून इतर रक्कम थकल्या असतील तर त्याचा तपशील द्या. | --- |
| | (ब) | कर्मचाऱ्यांसंबंधी त्यांची नावे, पदनाम, शैक्षणिक पात्रता, वेतन श्रेणी, सध्याचे वेतन व देण्यात येणारे भत्ते, नेमणूकीचा दिनांक, दिलेली अनामत रक्कम इ. माहिती दाखविणारी यादी मिळवा. | -होय- |

| क्र. | पदनाम | कर्मचाऱ्यांची संख्या |
|---|---|---|
| १. | मुख्य कार्यकारी व सचिव | १ |
| २. | हिशेबनीस | १ |
| ३. | सहाय्य लिपिक | ३ |
| ४. | वाहन चालक | - |
| ५. | शिपाई | १ |
| | एकुण | ६ |

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

| | | | |
|---|---|---|---|
| १०. | **उल्लंघन :** | | |
| | (i) | संस्थेकडे अधिनियम, नियम आणि नोंदणीकृत उपविधीची प्रत आहे का ? | -होय- |
| | (ii) | कायदा, नियम व पोटनियम यातील तरतूदींचे उल्लंघन झाल्याची माहिती देणे.<br>१. कलम क्र. ________________<br>२. नियम क्र. ________________<br>३. उपविधी क्र. ________________ | -लागू नाही- |
| | (iii) | उपविधीनुसार काही नियम तयार केले गेले आहेत का ? योग्य त्या अधिकाऱ्याकडून त्यास मान्यता मिळाली आहे का ? त्यांचे पालन योग्य रीतीने होते आहे का ? (उल्लंघनासंबंधी सर्वसाधारण अभिप्रायात थोडक्यात माहिती द्या.) | -होय- |
| ११. | **उत्पन्न आणि खर्च :** | | |
| | १. | मागील सहकार वर्षाच्या कालावधीत किती वाढावा किंवा तोटा झाला ? | ०१.०४.२०२० ते ३१.०३.२०२१<br>वाढावा : ₹ ८,०१,२३२.१० |
| | २. | निव्वळ वाढाव्याची विभागणी कशी करण्यात आली ते दर्शविणे. | (खालील तक्ता) |

| तपशील | रक्कम (₹) |
|---|---|
| राखीव निधी | २,०१,०००.०० |
| इमारत व विकास निधी | २,००,०००.०० |
| अप्रत्यक्षित आणि आकस्मिक दायित्व निधी | १,००,०००.०० |
| कर्मचारी ग्रॅच्युइटी निधी | १,००,०००.०० |
| कर्मचारी रजा रोखीकरण निधी | २,००,०००.०० |
| शिल्लक पुढे | २३२.१० |

| | | | |
|---|---|---|---|
| १२. | **रोख रक्कमा, बँकेतील शिल्लक आणि तारण :** | | |
| | अ) रोख रक्कम | | |
| | १. | रोख रक्कमेची मोजणी व त्यानुषंगाने सदर रक्कमेची तारखेसह रोख रक्कम पुस्तकात नोंद करुन हस्ताक्षर करणे. | रोख रक्कम शिल्लक – ₹ ५१,४१०/-<br>प्रत्यक्ष पडताळणी : दि.३१.०५.२०२२ |
| | २. | रोखपालाचे नाव आणि पदाचा तपशील देणे. त्यांना रोख ठेवण्याचा अधिकार आहे का ? | सौ. तनुजा गोळे (प्रमुख हिशेबनीस)<br>होय. ती अधिकृत व्यक्ती आहे. |
| | ३. | मोजण्यात आलेली रोकड रोख रक्कम पुस्तकाशी जुळत आहे का ? | -होय- |
| | ४. | तिजोरीतील रोख रक्कमेची व तीची देवाण-घेवाण करताना पुरेशा सुरक्षिततेची व्यवस्था करण्यात आली आहे का ? | -होय- |
| | **ब) बँक शिल्लक :** | | |
| | | बँक शिल्लक प्रत्यक्षात तपासण्यात आली आहे का ? हिशोबी पुस्तकात दर्शविलेल्या शिल्लकीनुसार बँक पत्रक व बँक शिल्लक प्रमाणपत्रके जुळत आहेत का ? जर नसतील तर जुळवणी पत्रकाची तपासणी करणे. | -होय- |
| | **क) रोखे** | | |
| | (१) | तारण दस्तऐवज प्रत्यक्षात तपासण्यात आले आहेत का ? आणि ते संस्थेच्या नावावरच आहेत का ? ते पहाणे. | -होय- |

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

| | | | |
|---|---|---|---|
| | (२) | लाभांश व व्याज यथावत वसूल करण्यात येत आहे का ? | पंजाब ॲण्ड महाराष्ट्र को-ऑप. बँकेतील ठेवींवरील व्याजाव्यतिरिक्त इतर बँकांच्या ठेवींवर यथावत व्याज वसुल करण्यात आले आहे. |
| | (३) | जर गुंतवणूक रोखे बँकेत ठेवले असतील तर त्याबाबतची संबंधीत प्रमाणपत्रे मिळविली आहेत का ? | -लागू नाही- |
| | (४) | गुंतवणूकीची नोंदवही यथोचित व अद्यावत ठेवली आहे का ? | -होय- |
| १३. | **स्थावर आणि जंगम मालमत्ता :** | | |
| | (१) | आवश्यक त्या नोंदवह्या ठेवल्या आहेत का ? व त्या अद्यावत लिहिल्या आहेत का ? | -होय- |
| | (२) | मालमत्तेची यादी घेऊन तपासणी करा आणि ती यादी ताळेबंदातील रक्कमेशी जुळत आहे का ? ते पाहणे. | -होय- |
| | (३) | जमीन आदी स्थावर मालमत्तेबाबत त्यांचे मालकी करारपत्र पाहणे व ते संस्थेच्या नावावरच आहेत का ? हे पाहणे. | -होय- |
| | (४) | मालमत्तेचा आवश्यक अद्यावत विमा उतरविला आहे का ? तसे असल्यास सर्वसाधारण अभिप्रायात त्याचा तपशील द्या. | -होय- |
| | (५) | **घसारा :** | |
| | | (i) घसारा यथावत आकारला आहे का ? | -होय- |
| | | (ii) विविध मालमत्तांवर आकारण्यात येणाऱ्या घसारा दरांचा तपशील देणे ? | (खालील तक्ता पहा) |
| १४. | लेखापरीक्षण मेमोच्या मसुद्याची चर्चा संचालक मंडळ व व्यवस्थापक समिती यांचेशी करण्यात आली आहे का ? नसल्यास त्याची कारणे लिहा. | | यासंदर्भात मुख्य कार्यकारी व सचिव यांचेशी चर्चा करण्यात आली आहे. |

| तपशील | % |
|---|---|
| फर्निचर आणि फिक्चर | १० |
| कार्यालयातील उपकरणे | १५ |
| संगणक | ३३.३३ |
| ग्रंथालयाची पुस्तके | २० |
| कार्यालयाचे वाहन | १५ |
| वातानुकुलित यंत्र | १५ |
| झेरॉक्स यंत्र | १५ |

**मे. एस. डी. साटम ॲण्ड कंपनी**
सनदी लेखापाल
संस्था नोंदणी क्र.११८३०२ डब्ल्यू

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

**(चार्टर्ड अकौंटंट संतोष साटम)**
स. क्र. १०४९०४

## दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक्स् फेडरेशन लि., मुंबई

**(महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० कलम ८१ (२) अन्वये द्यावयाचे शेरे)**

| क्र. | तपशील | लेखापरीक्षकाचे शेरे |
|---|---|---|
| १. | कर्जाची थकबाकी असल्यास | -लागू नाही- |
| २. | रोख शिल्लक, तारण दस्तऐवज आणि संस्थेची मालमत्ता व देयता यांचे मूल्यमापन | दि. ३१.०५.२०२२ रोजी रोख रक्कमेची पडताळणी केली असता ती यथायोग्य व बरोबर आढळली. |
| ३. | संस्थेने कर्ज व उचल देताना घेतलेले तारण पुरेसे सुरक्षित आहे का? तसेच ज्या अटी व शर्तींवर सदर कर्जे व उचल देण्यात आली आहेत, ती संस्थेच्या व तिच्या सभासदांच्या हितसंबंधांना बाधक ठरणारी आहेत का? | -लागू नाही- |
| ४. | केवळ पुस्तकी नोंदीद्वारे संस्थेकडून केले जाणारे व्यवहार संस्थेच्या हितसंबंधास बाधक आहेत का? | -नाही- |
| ५. | संस्थेने दिलेली कर्जे व उचल या ठेवी म्हणून दर्शविण्यात आल्या आहेत का? | -लागू नाही- |
| ६. | महसूल खात्यात वैयक्तिक खर्च नावे टाकण्यात आला आहे का? | -नाही- |
| ७. | आपली उद्दीष्टये साध्य करताना संस्थेला काही खर्च झाला आहे का? | -नाही- |
| ८. | शासन, शासकीय उपक्रम अथवा वित्त संस्था यांच्याकडून संस्थेला ज्या कारणासाठी अर्थ सहाय्य देण्यात आले असल्यास त्याचा विनियोग त्याच कारणासाठी संस्थेने केला आहे का? | शासन, शासकीय उपक्रम अथवा वित्त संस्था यांचेकडून कोणतेही आर्थिक सहाय्य संस्थेला करण्यात आले नाही. |
| ९. | संस्था सभासदांप्रति आपली उद्दीष्टये व जबाबदाऱ्या योग्य प्रकारे पार पाडत आहे किंवा कसे? | -होय- |

**मे. एस. डी. साटम ॲण्ड कंपनी**
सनदी लेखापाल
संस्था नोंदणी क्र.११८३०२ डब्ल्यू

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

**(चार्टर्ड अकौंटंट संतोष साटम)**
स. क्र. १०४९०४
ठिकाण : मुंबई
तारीख : ०६.०६.२०२२

# एस. डी. साटम ॲण्ड कंपनी

चार्टर्ड अकौंटंटस

सी-२००३, स्टेशन प्लाझा, स्टेशन रोड, भांडूप पश्चिम, मुंबई-४०० ०७८

दुरध्वनी – ९८२०४९६०८१ / ९८२०६४१९३६


## वैधानिक लेखापरीक्षण अहवाल

**दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशन लि., मुंबई** च्या दि.३१ मार्च,२०२२ अखेरच्या ताळेबंदाचे लेखापरीक्षण आम्ही केले आहे आणि आय-व्यय पत्रकाचादेखील आढावा घेतला आहे.

सदरहू आर्थिक हिशेबपत्रके तयार करण्याची जबाबदारी फेडरेशनच्या व्यवस्थापनाची आहे. आमची जबाबदारी केवळ आम्ही केलेल्या लेखापरीक्षणाच्या आधारावर या हिशेब पत्रकांवर अभिप्राय व्यक्त करण्याची आहे. मा. संचालक मंडळाने आखून दिलेल्या लेखापरीक्षण कक्षेच्या अधीन राहून सर्वसाधारणपणे स्वीकारल्या गेलेल्या लेखापरीक्षण मानदंडानुसार आम्ही संस्थेचे लेखापरीक्षण केले आहे. सदरहू लेखापरीक्षणामध्ये आर्थिक हिशेबपत्रकात दर्शविलेल्या रक्कमांना पुष्टी देणारे पुरावे चाचणी पद्धतीने तपासण्याचा समावेश आहे. आमचा विश्वास आहे की आमचे लेखापरीक्षण आम्ही दिलेल्या अभिप्रायासाठी पुरेसा व वाजवी आधार प्रदान करते.

आम्हांला मिळालेल्या माहिती आणि खुलाशाच्या आधारे आमचे असे मत आहे की :

१. आमच्या लेखापरीक्षणाच्या उद्देशासाठी, आपल्या सर्वोत्तम ज्ञानासाठी व विश्वासासाठी आवश्यक असलेली सर्व माहिती व खुलासे आम्हांला प्राप्त झाले आहेत.

२. फेडरेशनने ठेवलेली पुस्तके-वह्या यांच्या तपासणीवरुन महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, नियम व फेडरेशनच्या उपविधीनुसार फेडरेशनने हिशोबी पुस्तके योग्य पद्धतीने राखलेली आहेत.

३. फेडरेशनचे व्यवहार हे फेडरेशनच्या अधिकार कक्षेत असल्याचे आमच्या निदर्शनास आले आहे.

४. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी फेडरेशनला लेखापरीक्षण वर्ग 'अ' बहाल करण्यात आला आहे.

५. फेडरेशनचे हिशेब हे महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यानुसार आवश्यक ती माहिती देणारे असून फेडरेशनच्या आर्थिक व्यवहारांची सत्य व वास्तव स्थिती दर्शवितात.

   अ) ताळेबंदावरुन फेडरेशनची दि.३१ मार्च,२०२२ अखेरची व्यावहारीक स्थिती.

   ब) आयव्यय पत्रकावरुन फेडरेशनला संबंधीत वर्षाअखेर प्राप्त झालेला वाढावा.

६. वरील दाखला प्रसारित करण्यात येणाऱ्या लेखापरीक्षण अहवालातील भाग अ, ब आणि क मधील शेऱ्यास पात्र राहून देण्यात येत आहे.

तारीख : ०६.०६.२०२२

ठिकाण : मुंबई

**मे. एस. डी. साटम ॲण्ड कंपनी**

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

चार्टर्ड अकौंटंट

**(संतोष साटम)**

यूडीआयएन : 22104904AMVNKC9423

# परिशिष्ट

**राजीनामे नियमाप्रमाणे आहेत का आणि ते यथोचितरित्या स्वीकारण्यात आले आहेत का?**

**सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात रिझर्व्ह बँकेकडून खालील बँकांचे परवाने रद्द करण्यात आले, तसेच पंजाब ॲण्ड महाराष्ट्र को-ऑपरेटीव्ह बँकेचे युनिटी स्मॉल फायनॅन्स बँकेमध्ये विलिनीकरण करण्यात आले आहे.**

१. पंजाब ॲण्ड महाराष्ट्र को-ऑप. बँक लि., मुंबई
२. कर्नाळा नागरी सहकारी बँक लि., पनवेल
३. इंडिपेंडन्स को-ऑप. बँक लि., नाशिक
४. शिवम सहकारी बँक लि., इचलकरंजी, कोल्हापूर
५. दि कराड जनता सहकारी बँक लि., सातारा
६. वसंतदादा नागरी सहकारी बँक लि., उस्मानाबाद
७. भाग्योदय फ्रेंडस् अर्बन नागरी सहकारी बँक लि., अमरावती

******

S. D. SATAM & CO.
BHANDUP MUMBAI
CHARTERED ACCOUNTANTS

# दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशन लि.

## लेखा परीक्षण अहवाल

## २०२१-२२

## भाग-अ

## सामान्य निरीक्षण आणि शेरे

१ **प्रस्तावना :-**

- दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशन लि. (यानंतर 'फेडरेशन' म्हणून ओळखली जाईल) ची नोंदणी दि. ९ मार्च, १९७९ रोजी (नोंदणी क्रमांक BOM/GNL/8/1979) झाली असून संस्थेचे नोंदणीकृत कार्यालय, भारतीय क्रीडा मंदिर, चौथा मजला, नायगांव, वडाळा रोड, मुंबई - ४०० ०३१ येथे आहे. फेडरेशनचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र आहे. फेडरेशनला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील तरतूदी व नियम लागू आहेत.

- आपले दि. ५ ऑक्टोबर, २०२१ चे पत्र क्र. २१२/ वैधानिक लेखा परीक्षण/२०२१-२२ न्वये दि. ०१.०४.२०२१ ते ३१.०३.२०२२ या कालावधीसाठी फेडरेशनचे वैधानिक लेखापरीक्षण करण्यासाठी आमच्या संस्थेची नेमणूक करण्यात आली आहे. फेडरेशनने वैधानिक लेखापरीक्षण आम्हाला देण्यात आलेल्या पुस्तकी नोंदी व संबंधीत माहितीच्या आधारे करण्यात आले आहे.

- फेडरेशनच्या आर्थिक व्यवहारांची सत्य व वास्तव स्थिती दर्शविणारी आर्थिक हिशेबपत्रके तयार करण्याची जबाबदारी फेडरेशनच्या व्यवस्थापनाची राहील. आमची जबाबदारी ही लेखापरीक्षणाच्या आधारावर तयार करण्यात आलेल्या हिशेबपत्रकांवर मत व्यक्त करणे ही आहे. भारतीय वैधानिक लेखापरीक्षण संस्थेने जारी केलेल्या लेखापरीक्षण मानकांनुसार चाचणी, तपासणी आधारावर आम्ही संस्थेचे लेखापरीक्षण पूर्ण केले आहे.

२ **उद्देश :-**

**फेडरेशनची उद्दिष्टे-**

i) महाराष्ट्र राज्यातील नागरी सहकारी बँकांच्या कामकाजाशी समन्वय साधणे आणि सक्षम व पुरोगामी बँकिंग तत्त्वांचा प्रचार व प्रसार करणे व त्यात समानता आणणे.

ii) सभासद बँकांना आर्थिक तथा कायदेशीर आणि बँकिंग विषयक तसेच समान हिताच्या बाबींमध्ये सल्ला देणे.

iii) स्वत: अथवा भारतीय रिझर्व्ह बँक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक किंवा इतर कोणत्याही संस्थेमार्फत सभासद बँका आणि संघटनांच्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करणे.

iv) नागरी सहकारी बँकांना भेडसावणाऱ्या समस्या व त्यावर योग्य त्या उपाय योजना करणेकरिता तसेच फेडरेशनच्या भूमिकेचे समर्थन करण्याकरिता परिषदा, सेमिनार्स, परिसंवाद आणि अभ्यास गट आयोजित करणे.

v) महाराष्ट्र राज्यातील नागरी सहकारी बँकांच्या निकोप वाढीसाठी आणि संस्थेच्या उत्कर्षाकरिता संशोधन प्रकल्पांचे आयोजन करणे आणि नागरी सहकारी बँकांशी निगडीत विविध विषयांचा अभ्यास करणे.

vi) बँकांकडून वेळोवेळी त्यांच्या आर्थिक स्थितीबाबतची निवेदने व माहिती, त्यांच्या प्रसाराची, देवाणघेवाणाची व प्रकाशनाची व्यवस्था करणे.

vii) ज्ञानाचे भांडार म्हणून कार्य करणे आणि राज्यातील नागरी सहकारी बँकिंग प्रणालीची कार्यपद्धती, संघटनात्मक रचना व वित्तीय व्यवहार यांची बँकाकडून माहिती घेणे.

viii) नागरी सहकारी बँकांशी निगडीत इतर कोणतीही हिताची माहिती व मते यांची देवाणघेवाण करणे.

ix) नागरी सहकारी बँकिंग चळवळीतील सर्जनशीलता आणि विकासासाठी असलेल्या व्याप्ती, महती आणि क्रियाप्रकल्पांसंदर्भात सकारात्मक जनमत तयार करण्यासाठी त्यांना पुरेशी प्रसिद्धी देणे.

x) खालील संस्था/आस्थापना यांच्याशी सातत्याने संपर्क ठेवून व त्यांचेकडून प्राप्त झालेली माहिती सभासद बँकांना त्यांच्या हिताच्या दृष्टीने पुरविणे.

१. रिझर्व्ह बँकेशी संबंधित सर्व विभाग

२. सहकार आयुक्त व सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे व राज्य सरकारचे संबंधित सर्व अधिकारी

३. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई आणि अशा इतर संस्था

xi) पुरेसा राखीव निधी व वैधानिक तरलता निधी राखणे इ. संदर्भात वैधानिक जबाबदारींची पूर्तता सभासद बँकांकडून करणेसंदर्भात आवश्यक ती पावले उचलणे.

xii) सभासद बँकांना त्यांच्या विनंतीनुसार भेटी देण्याची व्यवस्था करणे आणि बँका व कर्मचारी संघटना यांचेत झालेल्या तडजोडी वा निकालांची अंमलबजावणी व त्याचे स्पष्टीकरण इ. संदर्भात सभासद बँकांना सल्ला देणे.

xiii) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व त्या अंतर्गत तयार केलेल्या नियमांनुसार शासन व निबंधक यांनी निर्गमीत केलेले आदेश, जबाबदाऱ्या योग्य प्रकारे पार पाडणे व त्याप्रमाणे हस्तांतरीत केलेल्या अधिकारांचा योग्यरित्या वापर करणे.

xiv) राज्यातील सहकारी वित्त आणि बँकिंगच्या संरचनेचा वेळोवेळी आढावा घेणे आणि त्यानुरुप सभासद बँकांना आणि/किंवा राज्य सरकार व भारतीय रिझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्यांना योग्य त्या शिफारसी करणे.

xv) फेडरेशनची उद्दीष्टे पूर्ण करण्यासाठी चेंबर्स ऑफ कॉमर्स, विद्यापीठे आणि इतर शैक्षणिक संस्था तसेच भारतीय राष्ट्रीय सहकारी संघ संचलित सहकारी प्रशिक्षण महाविद्यालये तसेच अन्य राज्यस्तरीय संघीय संस्था व संचालक मंडळाने ठरविलेल्या इतर संस्थांशी समन्वय व संपर्क राखणे.

xvi) फेडरेशनच्या विकासात्मक कामांसाठी निधी उभारणे वा कर्ज घेणे.

xvii) सर्व नागरी सहकारी बँकांना सहाय्य, सल्ला व मार्गदर्शन प्रदान करण्यासाठी, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने पुनर्वसन अंतर्गत वर्गीकृत केलेल्या बँका तसेच दुर्बल व महिला सहकारी बँकांच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी, त्यांच्या अडचणी आणि गरजा जाणून घेऊन त्यावर विशेष लक्ष देवून त्यांना पुनर्जिवीत करण्यासाठी मदत करणे.

xviii) नागरी सहकारी बँकांना सहकार, बँकिंग कायदा व तत्सम बाबींशी निगडीत नवीन होणाऱ्या सुधारणांची माहिती करुन देण्यासाठी वार्तापत्र प्रसिद्ध करणे.

S. D. SATAM & CO. BHANDUP, MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

xix) सभासद नागरी सहकारी बँकांना कार्यक्षम व उत्तम व्यवस्थापन करणे सुलभ व्हावे, याकरिता त्यांच्या विनंतीनुसार कर्मचारी सेवा नियम, स्थायी आदेश, वेतन करार करणेकरिता तसेच इतर तत्सम बाबींमध्ये सहाय्य करणे व योग्य त्या अधिकृत मंडळासमोर त्यांची बाजू मांडणे.

xx) सभासदांना सहकार व बँकिंग विषयाशी निगडीत शिक्षण व प्रशिक्षण प्रदान करणे.

xxi) रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार 'अंब्रेला ऑर्गनायझेशन' म्हणून काम करणे.

xxii) नागरी सहकारी बँकांकरिता नोकर भरती, निवड, मुलाखत व पदोन्नती कार्यक्रम आयोजित करणे.

## ३ सामान्य निरीक्षण आणि शेरे :

### १) लेखापरीक्षण माहिती:

- मे. एस. डी. साटम अॅण्ड कंपनी, चार्टर्ड अकौंटंटस्, वैधानिक लेखापरीक्षक, मुंबई यांनी दि. ०१.०४.२०२१ ते ३१.०३.२०२२ या कालावधीसाठी फेडरेशनचे वैधानिक लेखापरीक्षण दि. १२.०५.२०२२ रोजी सुरू केले व त्याची पूर्तता दि. ०४.०६.२०२२ रोजी झाली.
- आमच्यासमोर सादर केलेल्या नोंदी आणि संबंधित माहितीच्या आधारे संस्थेचे लेखापरीक्षण करण्यात आलेले आहे.

### २) सदस्य बँका :

सदस्य बँकांचे तपशील खालीलप्रमाणे आहेत :

| क्र. | तपशील | ३१.०३.२०२२ रोजी | ३१.०३.२०२१ रोजी | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा व विभागीय सहकारी बँकांच्या असोसिएशन्स | १८ | १८ | -- | -- |
| २ | नागरी सहकारी बँका | ४७३ | ४८० | -- | (७) |
| ३ | सहयोगी सभासद बँक | ०१ | १ | | . |
| | एकूण | ४९२ | ४९९ | -- | (७) |

- सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात रिझर्व्ह बँकेकडून खालील बँकांचे परवाने रद्द करण्यात आले, तसेच पंजाब अॅण्ड महाराष्ट्र को-ऑपरेटीव्ह बँकेचे युनिटी स्मॉल फायनॅन्स बँकेमध्ये विलिनीकरण करण्यात आले आहे.

  १) पंजाब अॅण्ड महाराष्ट्र को-ऑप. बँक लि., मुंबई
  
  २) कर्नाळा नागरी सहकारी बँक लि., पनवेल
  
  ३) इंडिपेंडन्स को-ऑप. बँक लि., नाशिक
  
  ४) शिवम सहकारी बँक लि., इचलकरंजी, कोल्हापूर
  
  ५) दि कराड जनता सहकारी बँक लि., सातारा
  
  ६) वसंतदादा नागरी सहकारी बँक लि., उस्मानाबाद
  
  ७) भाग्योदय फ्रेंड्स अर्बन नागरी सहकारी बँक लि., अमरावती

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

अ) सभासद नोंदणी अर्ज :

- सभासदांच्या नोंदणी अर्जाची तपासणी करण्यात आली व ती योग्य आढळली. (संचालक मंडळाच्या सभेत ठराव संमत करून सभासदांची थेट नेमणूक केली जाते.)

ब) 'जे' फॉर्म रजिस्टर :

- फेडरेशनने 'जे' फॉर्म रजिस्टर ठेवले आहे. सभासदांची नावे, पत्ते इ. बाबतचा तपशील रजिस्टर मध्ये योग्यरित्या नमूद केलेला आहे.
- उपविधीनुसार फेडरेशनला त्यांच्या सभासदांना 'भाग' देता येत नाहीत.
- फेडरेशन सभासदांकडून प्रवेश शुल्क म्हणून प्रति सदस्य रु. ५००/- स्वीकारत आहे.
- वर्षाच्या शेवटी प्रवेश शुल्काद्वारे प्राप्त झालेली एकूण रक्कम राखीव निधीत वर्ग केली आहे.

३) कर्ज आणि आगाऊ :

आर्थिक वर्षात फेडरेशनने कोणतेही बाह्य कर्ज घेतलेले नाही.

४) सभा आणि इतिवृत्त रजिस्टर:

अ) वार्षिक सर्वसाधारण सभा :

आर्थिक वर्षात फेडरेशनची वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २९ सप्टेंबर, २०२१ रोजी घेण्यात आली. सदर सभेच्या इतिवृत्ताची रीतसर नोंद ठेवण्यात आली आहे. सदर सभेत चर्चीले गेलेले मुख्य मुद्दे पुढीलप्रमाणे:

- दि. ३१ मार्च, २०२१ रोजीचे आयपत्रक व ताळेबंदास मान्यता देणे.
- सन २०२०-२१ मध्ये फेडरेशनने रु. ८,०१,२३२.१० चा निव्वळ वाढावा प्राप्त केला होता.
- सदर रु. ८,०१,२३२.१० च्या वाढाव्याचे विनियोजन खालीलप्रमाणे आहे.

| तपशील | रक्कम (रु.) |
|---|---|
| राखीव निधी @ २५ % | २,०१,०००.०० |
| इमारत व विकास निधी | २,००,०००.०० |
| अनपेक्षित देणी निधी | १,००,०००.०० |
| कर्मचारी ग्रॅच्युईटी निधी | १,००,०००.०० |
| रजा रोखीकरण निधी | २,००,०००.०० |
| पुढील वर्षासाठी शिल्लक | २३२.१० |
| एकूण | ८,०१,२३२.१० |

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

ब) संचालक मंडळ सभा :

- आर्थिक वर्षात ५ संचालक मंडळ सभा व २ उपसमिती सभा घेण्यात आल्या.
- संचालक मंडळ सभेची इतिवृत्ते योग्य रितीने लिहिलेली आणि स्वतंत्र रजिस्टर मध्ये ठेवलेली आहेत.
- कोव्हिड-१९ या साथीच्या रोगामुळे व त्यानुषंगाने देशभरात जाहिर केलेल्या संचारबंदीमुळे, फेडरेशनची वार्षिक सर्वसाधारण सभा सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थितीने तसेच व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे दि. २९ सप्टेंबर, २०२१ रोजी घेण्यात आली व त्यानुषंगाने त्यांची सचिव निहाय पूर्तता करण्यात आली आहे.

५) वैधानिक पूर्तता :

- फेडरेशनने दि. १७.०९.२०२१ रोजी सन २०२०-२१ च्या लेखापरीक्षण अहवालावर दोषदुरुस्ती अहवाल 'नमुना ओ' मध्ये तयार करुन निबंधकास सादर केला आहे.

६) वैधानिक लेखापरीक्षकाचे शुल्क -

फेडरेशनने सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरीक्षणाचे शुल्क रक्कम रु. ६,९८६/- (जीएसटी वगळता) अदा केले आहे आणि पावतीची प्रत पडताळणीसाठी उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

७) नोंदवही (रजिस्टर्स):

आम्ही खालील रजिस्टर्स तपासली असून आमची निरीक्षणे खालीलप्रमाणे आहेत :

| क्र. | नोंदणीचेनाव | निरीक्षण |
|---|---|---|
| १ | गुंतवणूकीची नोंदवही | नोंदवही व्यवस्थित व अद्ययावत ठेवण्यात आली आहे. |
| २ | रजेची नोंदवही | नोंदवही संगणक प्रणालीमध्ये योग्यरित्या व अद्ययावत राखण्यात आली आहे. |
| ३ | उपस्थिती नोंदवही | नोंदवही योग्यप्रकारे राखून अद्ययावत केली आहे. |
| ४ | वेतन नोंदवही | नोंदवही योग्यप्रकारे राखून अद्ययावत केली आहे. |

८) संचालक मंडळ :

- सन २०१४-१५ ते २०१९-२० या कालावधीसाठी संचालक मंडळाची निवड करण्यात आली आहे.
- कोव्हिड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात फेडरेशनच्या संचालक मंडळाची निवडणूक होऊ शकली नाही. सबब सद्याचे संचालक अद्यापही संचालक मंडळावर कार्यरत आहेत.
- सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात फेडरेशनच्या संचालक मंडळावर २० संचालक सदस्य आहेत. (परिशिष्ट १ पहा)

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

९) अध्यक्ष व मुख्य कार्यकारी आणि सचिव :

- आर्थिक वर्षात श्री. विद्याधर वा. अनास्कर हे अध्यक्ष व सौ. सायली संजय भोईर या फेडरेशनच्या मुख्य कार्यकारी व सचिव आहेत.

१०) लेखा परीक्षण वर्ग :

फेडरेशनने केलेली वैधानिक पूर्तता, फेडरेशनचे उत्पन्न व खर्च, सभासद वर्गणी वसूली, निधी गुंतवणूक, फेडरेशनचे एकूण कामकाज, कायदेविषयक बाबींचा पाठपुरावा, समित्या व कर्मचाऱ्यांचे कामकाज, नियम व निकषांचे पालन, सभा व त्यांचे अनुपालन, प्रक्रियात्मक अनुपालन, सभासदांमध्ये वाढ इ. ची तपासणी केल्यावर सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी आम्ही फेडरेशनला लेखापरीक्षण वर्ग "अ" देत आहोत.

********

S. D. SATAM & CO.
BHANDUP
MUMBAI
CHARTERED ACCOUNTANTS

## भाग-ब

### खतावणी छाननी :

अ. देयता

१. राखीव आणि इतर निधी - रु. ७,५४,७४,३२६.०७

- निधी

| तपशील | शिल्लक ३१.०३.२०२२ | शिल्लक ३१.०३.२०२१ | वाढ |
|---|---|---|---|
| राखीव निधी | ९६,५२,८५५.०० | ९४,५१,८५५.०० | २,०१,०००.०० |
| इमारत आणि विकास निधी | ३,३३,५९,७०१.०० | ३,११,५९,७०१.०० | २२,००,०००.०० |
| कर्मचारी ग्रॅच्युइटी निधी | १,०९,४९,२८७.०७ | ८९,१३,४६३.०७ | २०,३५,८२४.०० |
| कर्मचारी रजा रोखीकरण निधी | ६७,०६,४८३.०० | ४९,८४,०८१.०० | १७,२२,४०२.०० |
| लीज धारण जागेसाठी परिशोधन निधी | १५,२५,०००.०० | १४,७५,०००.०० | ५०,०००.०० |
| अप्रत्यक्षित आणि आकस्मिक दायित्व निधी | ७४,३७,०००.०० | ६१,३७,०००.०० | १३,००,०००.०० |
| कर्मचारी कल्याण निधी | ५६,४४,०००.०० | ३६,४४,०००.०० | २०,००,०००.०० |
| गुंतवणूकीसाठी खास निधी | ०.०० | ३२,००,०००.०० | (३२,००,०००.००) |
| निवडणूक निधी | २,००,०००.०० | ३,८२,०००.०० | (१,८२,०००.००) |
| एकूण | ७,५४,७४,३२६.०७ | ६,९३,४७,१००.०७ | ६१,२७,२२६.०० |

- आर्थिक वर्षाच्या कालावधीत राखीव व इतर निधी मध्ये रक्कम रु. ६१,२७,२२६/- ची वाढ झालेली आहे.
- फेडरेशनचे कार्यालय असलेल्या लीजधारण जागेचे मुल्यांकन (मुळ करार रक्कम) रु. ३०,००,०००/- असून सदर जागा ६० वर्षाच्या लीजवर फेडरेशनला देण्यात आलेली असल्याने सदर रक्कम समभागात ६० वर्षात विभागण्यात आली आहे. त्यानुषंगाने आर्थिक वर्षाच्या कालावधीत लीजधारण जागेसाठी परिशोधन (Amortization) निधीत रु. ५०,०००/- वर्ग करण्यात आले आहेत.
- वर्षभरात रु. ९२,००,०००/- च्या वाढाव्याचे खालीलप्रमाणे विविध निधीत विनियोजन करण्यात आले आहे.

| तपशील | रक्कम (रु.) |
|---|---|
| इमारत व विकास निधी | २०,००,०००.०० |
| कर्मचारी ग्रॅच्युइटी निधी | २०,००,०००.०० |
| कर्मचारी रजा रोखीकरण निधी | २०,००,०००.०० |
| कर्मचारी कल्याण निधी | २०,००,०००.०० |
| अप्रत्यक्षित आणि आकस्मिक दायित्व निधी | १२,००,०००.०० |
| एकूण | ९२,००,०००.०० |

- कर्मचारी ग्रॅच्युइटी निधी आणि कर्मचारी रजा रोखीकरण निधीची तरतूद वास्तविक मूल्यांकनावर आधारित आहे.

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

२. **थकीत वर्गणीची तरतूद - रु. ९८,१५,६४५.००**

- वर्षभरात फेडरेशनने चालू वर्षाच्या वर्गणीसाठी रक्कम रु. २७,२६,३९२/- ची तरतूद केली आहे. तसेच जुन्या थकीत वर्गणी मधून रु. १३,५३,००३/- ची येणे वर्गणी वसूल करण्यात आली आहे. सदर थकीत वर्गणीचा वर्ष-निहाय तपशील 'व्यापारी येणी'मध्ये सविस्तर देण्यात आला आहे.

३. **देणे बाकी - रु. ९,८६,९२४.५८**

- देणे बाकी मध्ये आर्थिक वर्षातील खर्चाच्या तरतुदींचा समावेश आहे. (परिशिष्ट २ पहा)

४. **आगाऊ वर्गणी - रु. १,१०,८५८.१८**

- वरील रक्कम फेडरेशनला सदस्य बँकांकडून आगाऊ प्राप्त झालेली सभासद वर्गणी दर्शविते. सदर रक्कम ही सभासद बँकांकडून घेण्यात येणाऱ्या वार्षिक वर्गणी व इतर येणे रक्कमांशी तडजोड करुन निकाली काढण्यासाठी फेडरेशनने योग्य ती पावले उचलणे आवश्यक आहे. (परिशिष्ट ३ पहा)

ब) **मालमत्ता**

१. रोख रक्कम-

- वर्षाअखेर फेडरेशनकडे रोख रक्कम रु. ३,६८३/- होती.
- दि. ३१.०५.२०२२ रोजी रोख रक्कमेची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात आली असता ती रु. ५१,४१०/- शिल्लक असल्याचे आढळले व सदर रक्कम रोख वहीशी तंतोतंत जुळत होती.

२. **बँकेतील शिल्लक - रु. ९९,५६,८२४.९२**

दि. ३१ मार्च,२०२२ अखेरपर्यंत सर्व बँक खात्यांची जुळवणी झाली आहे आणि तीन महिन्यांपेक्षा जास्त काळ कोणत्याही नोंदी प्रलंबित नाहीत. बँकेतील शिल्लक खालीलप्रमाणे आहे.

| क्र. | तपशील | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक बचत खाते | १,९२,३६३.७० |
| २ | अपना सहकारी बँक बचत खाते | २,९१,७२७.७६ |
| ३ | यूको बँक बचत खाते | २,४३,४३६.४६ |
| ४ | युनिटी स्मॉल फायनॅन्स बँक चालू खाते | ९२,२९,२९७.०० |

खाते व बँक प्रमाणपत्रांनुसार शिल्लक रक्कमेच्या तरतुदींचा समावेश आहे. (परिशिष्ट ४ पहा)

३. गुंतवणूक - रु. ६,१६,७८,०००/-

फेडरेशनने विविध बँकांमधील मुदत ठेवींमध्ये खालीलप्रमाणे गुंतवणूक केली आहे :

| क्र. | बँकेचे नाव | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| १ | अपना सहकारी बँक लि. | ७८,०००.०० |
| २ | जी. पी. पारसीक जनता सहकारी बँक लि. | ५,००,०००.०० |
| ३ | जी एस महानगर को-ऑप. बँक लि. | १०,००,०००.०० |
| ४ | दि महाराष्ट्र राज्य को-ऑप. बँक लि., मुंबई | २,२९,००,०००.०० |
| ५ | एस व्ही सी को-ऑपरेटिव्ह बँक लि. | १,००,००,०००.०० |
| ६ | दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँक लि. | १०,००,०००.०० |
| ७ | दि एन के जी एस बी को-ऑपरेटिव्ह बँक लि. | १०,००,०००.०० |
| ८ | दि सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि. | ९०,००,०००.०० |
| ९ | टी जे एस बी सहकारी बँक लि., ठाणे | ५५,००,०००.०० |
| १० | युको बँक लि. | १,०७,००,०००.०० |
| | एकूण | ६,१६,७८,०००.०० |

- गुंतवणूकीशी संबंधीत सर्व मुदत ठेव पावत्यांची प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली आणि त्यात कोणतीही अनियमितता आढळली नाही.
- सदर गुंतवणूक निबंधकांनी मंजूर केलेल्या उपविधीनुसार करण्यात आली आहे.
- गुंतवणूकीवर मिळणारे व्याज रु. १५,९३१/- ची योग्य रीतीने पुस्तकी नोंद करण्यात आली आहे.

४. इतर ठेवी - रु.५८,७२८/-

इतर ठेवी खालीलप्रमाणे आहेत :

| क्र. | तपशील | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| १ | दूरध्वनी ठेव | ११,५००.०० |
| २ | बी.ई.एस.टी. ठेव | ४१,६०३.०० |
| ३ | महानगरपालिका पाणी मीटर सुरक्षा ठेव | ५,६२५.०० |
| | एकूण | ५८,७२८.०० |

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

५. व्यापारी येणी- रु. ९८,१५,६४५/-

- व्यापारी येणीमध्ये सभासदांकडून येणे असलेल्या वर्गणीचा समावेश आहे.
- येणे सभासद वर्गणीचा वर्ष-निहाय तपशील खालीलप्रमाणे आहे :

| थकबाकी | रक्कम(रु.) |
|---|---|
| १ वर्षा पेक्षा कमी | २७,२६,३९२.०० |
| १ ते ३ वर्षे | ४२,७०,४६३.०० |
| ३ ते ५ वर्षे | १२,७७,०३३.०० |
| ५ वर्षांपेक्षा जास्त | १५,४१,७५७.०० |
| एकूण | ९८,१५,६४५.०० |

६. स्थावर मालमत्ता - रु. २०,२६,७१०.९३

| तपशील | रक्कम (रु.) |
|---|---|
| वातानुकूलित यंत्र | १,४९,२८१.०० |
| संगणक | ६६,३६४.०० |
| फर्निचर आणि फिक्स्चर | ९,२२,७२१.१३ |
| ग्रंथालयाची पुस्तके | ६१,४८७.८० |
| कार्यालयीन उपकरणे | ७४,०१३.०० |
| कार्यालयीन वाहन | ७,२८,९१७.०० |
| झेरॉक्स यंत्र | २३,९२७.०० |
| एकूण | २०,२६,७१०.९३ |

- लेखापरीक्षण कालावधीत संगणक, ग्रंथालयाची पुस्तके, कार्यालयीन वाहन व कार्यालयीन उपकरणे यांत वाढ झालेली आढळून आली.
- घसारा वार्षिक पद्धतीने आकारला जातो.

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

७. इतर मालमत्ता - रु. १५,७८,९९१/-

| तपशील | रक्कम (रु.) | शेरा |
|---|---|---|
| वार्षिक देखभाल करारावर करण्यात आलेला आगाऊ खर्च | ३५,५१६.०० | |
| आगाऊ भरलेले विमा चार्जेस | २३,५१८.०० | |
| बी.एम.असोसिएशन कडून येणे बाकी असलेले पाणी शुल्क | ३,९६८.०० | |
| आर सी एम जीएसटी | ९००.०० | |
| आयकर मागणी | ७,०७,१५५.०० | |
| टी.डी.एस. येणे बाकी | ८,०७,९३४.०० | तपशील खालीलप्रमाणे आहे :<br>२०१४-१५ २१,२५०.००<br>२०१५-१६ १,४०३.००<br>२०१६-१७ २६,७७९.००<br>२०१७-१८ १८,६०६.००<br>२०१९-२० ६६,६६६.००<br>२०२०-२१ १,११,७०८.००<br>२०२१-२२ २,५७,३८७.००<br>२०२२-२३ ३,०४,१३५.०० |
| **एकूण** | १५,७८,९९१.०० | |

क. **आय-व्यय पत्रक:**

आम्ही संबंधीत पावत्या तपासल्या असून आम्हाला त्या बरोबर आढळल्या आहेत.

३१.०३.२०२२ रोजीचे आय-व्यय पत्रक खालीलप्रमाणे आहे.

| तपशील | ३१.०३.२०२२ | ३१.०३.२०२१ | वाढ / (घट) | % बदल |
|---|---|---|---|---|
| उत्पन्न | | | | |
| सभासद वर्गणी | १,०२,५०,६११.०० | ९८,५०,१५९.०० | ४,००,४५२.०० | ४.०७ |
| गुंतवणूकीवरील व्याज | ४१,१०,१४७.०० | ३५,९४,८७७.०० | ५,१५,२७०.०० | १४.३३ |
| इतर उत्पन्न | ४६,७६,५२६.०० | २,२६,४९४.०० | ४४,५०,०३२.०० | १९६४.७५ |
| एकूण उत्पन्न (अ) | १,९०,३७,२८४.०० | १,३६,७१,५३०.०० | ५३,६५,७५४.०० | ३९.२५ |

| खर्च | ३१.०३.२०२२ | ३१.०३.२०२१ | वाढ / (घट) | % बदल |
|---|---|---|---|---|
| कर्मचारी खर्च | ५३,०६,६२०.०० | ५०,६३,१०९.०० | २,४३,५११.०० | ४.८१ |
| संचालक मंडळ खर्च | ३,१६,८४४.०० | ९१,२९३.०० | २,२५,५५१.०० | २४७.०६ |
| कार्यालयीन खर्च | ४,८८,६००.०० | ३,१४,२२०.०० | १,७४,३८०.०० | ५५.५० |
| शुल्क, कमिशन इ. | ३,१५,१६७.०८ | १,७५,९६४.०४ | १,३९,२०३.०४ | ७९.११ |
| मालमत्ता खर्च (भाडे, कर, विमा, विद्युत, घसारा, दुरुस्ती इ.) | ८,७६,७६८.०० | ७,४१,७८४.०० | १,३४,९८४.०० | १८.२० |
| इतर खर्च | १६,०७,५०७.०० | १४,७७,१३४.०० | १,३०,३७३.०० | ८.८३ |
| **एकूण खर्च (ब)** | ८९,११,५०६.०८ | ७८,६३,५०४.०४ | १०,४८,००२.०४ | १३.३३ |
| **ढोबळ वाढावा (क = अ - ब)** | १,०१,२५,७७७.९२ | ५८,०८,०२५.९६ | ४३,१७,७५१.९६ | ७४.३४ |
| **विविध निधीमध्ये वर्ग (ड)** | ९२,००,०००.०० | ५०,०७,०००.०० | ४१,९३,०००.०० | ८३.७४ |
| **निव्वळ वाढावा (इ = क- ड)** | ९,२५,७७७.९२ | ८,०१,०२५.९६ | १,२४,७५१.९६ | १५.५७ |

- आर्थिक वर्षामध्ये फेडरेशनचा निव्वळ वाढावा रु. १,२४,७५१.९६ ने वाढलेला आहे. फेडरेशनचा ढोबळ वाढावा रु. ४३,१७,७५१.९६ ने वाढलेला आहे. सदर वाढ ही प्रामुख्याने इतर उत्पन्नातील वाढीमुळे झालेली आहे जी मुख्यत्वे रु. ३२ लाख गुंतवणुकीची विशेष राखीव तरतूद रद्दबातल केल्यामुळे व प्रशिक्षण शुल्क रु. १०,८६,५००/- मिळाल्यामुळे झाली आहे. फेडरेशनने सभासद वर्गणीची नोंद व्यापारी तत्वाऐवजी प्राप्तीच्या आधारावर केली आहे.

विविध निधीमध्ये वर्गीकृत झालेल्या निधीचा तपशील खालीलप्रमाणे आहे :

| तपशील | रक्कम (रु.) |
|---|---|
| इमारत व विकास निधी | २०,००,०००.०० |
| कर्मचारी कल्याण निधी | २०,००,०००.०० |
| कर्मचारी ग्रॅच्युइटी निधी | २०,००,०००.०० |
| कर्मचारी रजा रोखीकरण निधी | २०,००,०००.०० |
| अप्रत्यक्षित आणि आकस्मिक दायित्व निधी | १२,००,०००.०० |
| एकूण | ९२,००,०००.०० |

- आर्थिक वर्षाच्या कालावधीत लीजधारण जागेसाठी परिशोधन (Amortization) निधीत रु. ५०,०००/- वर्ग करण्यात आले आहेत, कारण सदर लीजधारण जागेची मुळ किंमत रु. ३०,००,०००/- असून ६० वर्षाच्या कालावधीकरिता सदर जागा फेडरेशनला लीजवर देण्यात आली आहे. सबब सदर रक्कम ६० वर्षात समभागात विभागण्यात आली आहे.

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

ड) **कर्मचारी संबंधित बाबी :**

१. **कर्मचारी भविष्य निर्वाह निधी - रु. ४,१३,०९१.००**

- वर्षभरात फेडरेशनने कर्मचारी भविष्य निर्वाह निधीसाठी रु. ४,१३,०९१/- चे योगदान दिले आहे.
- आम्ही भविष्य निर्वाह निधीचे चलन, वजावटी आणि त्याचा भरणा संस्थेने वेळेवर करण्यात आला असल्याची तपासणी केली व आम्हांस ते व्यवस्थित व वेळेवर केल्याचे आढळले आहे.

२. **ग्रॅच्युइटी - रु. १,०९,४९,२८७.०७**

- लेखापरीक्षण कालावधीत ग्रॅच्युइटी रक्कम रु. ६४,१७६/- देण्यात आली.
- ग्रॅच्युइटीबाबतचे दायित्व वास्तविक आधारावर व मूल्यांकनावर करण्यात आले आहे.
- दि.३१.०३.२०२२ रोजी रक्कम रु. २१,००,०००/- ची तरतूद ग्रॅच्युइटीकरिता करण्यात आली आहे.

३. **रजेचे रोखीकरण - रु. ६७,०६,४८३.००**

- लेखापरीक्षण कालावधीत अदा करण्यात आलेल्या रु. ४,७७,५९८/- रक्कमेच्या रजेच्या रोखीकरणाची तपासणी करण्यात आली व आम्हाला ती व्यवस्थित आढळली आहे.
- दि. ३१.०३.२०२२ रोजी रु. २२,००,०००/- ची तरतूद रजा रोखीकरणाकरिता करण्यात आली आहे.

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

## भाग - क

सामान्य निरीक्षणे –

प्रमुख निरीक्षणे –

१) फेडरेशनची सध्याची कार्यालयीन जागा ही लीज तत्त्वावर असून त्यासाठी फेडरेशनने रक्कम रु. ३० लाखांची ठेव ठेवली आहे. लीज करारानुसार, फेडरेशनला सदरहू जागा पोट-भाड्याने देण्याची परवानगी नाही. परंतु फेडरेशनने जागेचा काही भाग दि बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स असोसिएशन लि. ला भाड्याने दिलेला आहे आणि त्याकरिता ठेव म्हणून रु. ७,४४,७५०/- सदर असोसिएशनकडून फेडरेशनला प्राप्त झाले आहेत.

२) सभासदांकडून थकीत सदस्यता शुल्क वसूल करण्यासाठी फेडरेशन सातत्याने प्रयत्न करीत आहे. या आर्थिक वर्षात फेडरेशनने मागील आर्थिक वर्षातील रु. १३,५३,००३/- थकीत सभासद वर्गणी वसूल केली आहे.

३) केंद्र सरकारने पंजाब ॲण्ड महाराष्ट्र को-ऑपरेटीव्ह बँक लि. चे युनिटी स्मॉल फायनॅन्स बँक लि. मध्ये विलिनीकरण करण्याच्या योजनेस मंजुरी दिली आहे . सदर योजना दि. २५ जानेवारी, २०२२ पासून अंमलात आली आहे. त्यानुषंगाने पीएमसी बँकेतील दि. २५/०१/२०२२ पर्यंतची शिल्लक युनिटी स्मॉल फायनॅन्स बँकेच्या नावे दि. ३१/०३/२०२२ अखेर दाखविण्यात आलेली आहे. यासंदर्भात सदरहू गुंतवणूकीवर पूढील तरतूद करणेसंदर्भात कोणतेही स्पष्टीकरण प्राप्त न झाल्याने योग्य ती तरतूद या गुंतवणूकीवर करण्यात आली नसल्याचा फेडरेशनने खुलासा केला आहे.

फेडरेशनने पूर्वी केलेली रु. ३२.०० लाखाची तरतूद चालू आर्थिक वर्षात उलटवलेली आहे.

## आभार प्रदर्शन :

लेखापरीक्षण कालावधी दरम्यान आम्हांस फेडरेशनची व्यवस्थापकीय समिती, मुख्य कार्यकारी आणि सचिव आणि कर्मचारी वर्गाकडून प्राप्त झालेल्या सहकार्याबद्दल आम्ही मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो.

ठिकाण : मुंबई
तारीख : ०६.०६.२०२२

मे. एस. डी. साटम ॲण्ड कंपनी
चार्टर्ड अकौंटंटस्

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

(सीए संतोष साटम)

# परिशिष्ट १

## आर्थिक वर्ष २०२०-२१या कालावधीतीलसंचालक सदस्यांची यादी

| अ.क्र. | संचालकांचेनाव | प्रतिनिधीत्वकरत असलेल्या बँकेचे / संघटनेचे नाव |
|---|---|---|
| १ | मा.श्री.विद्याधर वामनराव अनास्कर (अध्यक्ष) | विद्या सहकारी बँक लि.,पुणे |
| २ | मा.श्री.रमाकांत उमाशंकर खेतान (उपाध्यक्ष) | दि अकोला जनता कमर्शिअल को-ऑप.बँक लि.,अकोला |
| ३ | मा.श्री.आनंदराव विठोबा अडसूळ (संचालक) | दि सिटी को-ऑप.बँक लि.,मुंबई |
| ४ | मा.श्री.संदिप सिताराम घनदाट (संचालक) | अभ्युदय को-ऑप.बँक लि.,मुंबई |
| ५ | मा.श्री.ज्ञानेश्वर बापूसाहेब वांगडे (संचालक) | दि सातारा सहकारी बँक लि.,मुंबई |
| ६ | मा.श्री.अजय जव्हेरीलाल ब्रम्हेचा (संचालक) | दि लासलगांव मर्चन्टस् को-ऑप.बँक लि.,लासलगांव |
| ७ | कै. भास्करराव कृष्णा कोठावदे (संचालक)<br>(मृत्यु: दि. २४ मे, २०२२) | दि ओझर मर्चन्टस् को-ऑप.बँक लि.,ओझर |
| ८ | मा.श्री.अुत्तम भास्कर जोशी (संचालक) | ठाणे भारत सहकारी बँक लि.,ठाणे |
| ९ | मा.श्री.विजय प्रकाश ढेरे (संचालक) | पुणे मर्चन्टस् को–ऑप.बँक लि.,पुणे |
| १० | कै.दामोदर कृष्णाजी माजगांवकर<br>(मृत्यु: दि. ०४ सप्टेंबर, २०२०) | ओमदत्त चैतन्य सहकारी बँक लि., वाई |
| ११ | मा.श्री.सुनिल ओमप्रकाश देवडा (संचालक) | ओमप्रकाश देवडा पीपल्स को-ऑप.बँक लि.,हिंगोली |
| १२ | मा.श्री.सतिश भगवानदास गुप्ता (संचालक) | दि चिखली अर्बन को-ऑप.बँक लि.,चिखली |
| १३ | मा.श्री.कैलाशचंद्र जुगलकिशोर अग्रवाल (संचालक) | दि विदर्भ अर्बन बँक्स् को-ऑप. बँक्स् असोसिएशन लि.,नागपूर |
| १४ | मा.श्री. जगदिश प्रल्हाद तुळजापूरकर (संचालक) | दि सोलापूर जिल्हा नागरी सह. बँक्स् असोसिएशन लि.,सोलापूर |
| १५ | मा.श्री.दुर्गादास दत्तात्रय नेवे (संचालक) | दि जळगांव जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन लि., जळगांव |
| १६ | मा.श्री.जयवंत शंकर जालगांवकर (संचालक) | दापोली अर्बन को-ऑप.बँक लि.,दापोली |
| १७ | मा.श्री.अशोक भिकाजी शेळके (संचालक) | श्री स्वामी समर्थ सहकारी बँक लि.,निघोज |
| १८ | मा.श्री.प्रकाश कोंडीराम गवळी (संचालक) | जनता सहकारी बँक लि.,सातारा |
| १९ | मा.श्रीमती शोभाताई सुधाकर सावंत (संचालिका) | दि अण्णासाहेब सावंत अर्बन को-ऑप.बँक लि.,महाड |
| २० | मा.डॉ.शशीताई भगवानराव अहिरे (संचालिका) | दि नाशिक जिल्हा महिला सहकारी बँक लि.,नाशिक |
| २१ | मा.श्री.सिताराम बाबूराव आडसूळ (स्वीकृत संचालक) | दि बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स् असो.लि.,मुंबई |
| २२ | मा.श्री.संजय नाथुजी भेंडे (स्वीकृत संचालक) | नागपूर नागरीक सहकारी बँक लि., नागपूर |
| २३ | मा.सौ.सायली संजय भोईर (मुख्य कार्यकारी व सचिव) | दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप.बँक्स् फेडरेशन लि.,मुंबई |

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

## परिशिष्ट २

### दि. ३१ मार्च, २०२२ वर्षा अखेरची देणे बाकी

| तपशील | रक्कम (रु.) |
|---|---:|
| वीज देय शुल्क | ९,२९१.०० |
| अंतर्गत लेखापरीक्षण देय शुल्क | २०,०००.०० |
| देय कर्मचारी करार | ५,५००.०० |
| सभासद वर्गणी (नॅफकब) देय | ८०,०००.०० |
| सानुग्रह अनुदानाकरिता तरतुद | ७,२१,४८८.०० |
| कर्मचारी सुरक्षा ठेव | ६६,०००.०० |
| वैधानिक लेखापरीक्षण देय शुल्क | ९,६६९.०० |
| देय टीडीएस | १,४२४.०० |
| दूरध्वनी देय शुल्क | १,१२०.०० |
| देय जीएसटी | ७२,४३२.५८ |
| एकूण | ९,८६,९२४.५८ |

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

# परिशिष्ट ३

## आगाऊ सभासद वर्गणी

| अ.क्र. | तपशील | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| १ | अभिनंदन अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अमरावती | ८१०.०० |
| २ | अहमदनगर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन लि. | १०.०० |
| ३ | बाबाजी दाते महिला सहकारी बँक लि., यवतमाळ | १२५.०० |
| ४ | धर्मवीर संभाजी अर्बन को-ऑप. बँक लि., पुणे | २०,०००.०० |
| ५ | धुळे ॲण्ड नंदुरबार जिल्हा सरकारी नोकरांची सहकारी बँक लि., धुळे | ४,६०१.१८ |
| ६ | जनता को-ऑपरेटिव्ह बँक लि., मालेगाव | ८१०.०० |
| ७ | जनकल्याण को-ऑपरेटिव्ह बँक लि., नाशिक | ३,९९०.०० |
| ८ | लोणावळा सहकारी बँक लि., पुणे | ३,३१४.०० |
| ९ | नाशिक डिस्ट्रिक्ट इंडस्ट्रिअल ॲण्ड मर्कटाईल को-ऑपरेटिव्ह बँक लि., नाशिक | १,०००.०० |
| १० | प्रवरा सहकारी बँक लि., अहमदनगर | ५५०.०० |
| ११ | शिवपार्वती महिला नागरी सहकारी बँक लि., परभणी | १८,०१०.०० |
| १२ | श्री पंचगंगा नागरी सहकारी बँक लि., कोल्हापूर | १२५.०० |
| १३ | दि अंबिका महिला सहकारी बँक लि., अहमदनगर | ७००.०० |
| १४ | दि डेक्कन मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई | ३५,०००.०० |
| १५ | दि मालेगांव मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँक लि., नाशिक | ७६३.०० |
| १६ | दि मुस्लिम को-ऑपरेटिव्ह बँक लि., पुणे | १,०५०.०० |
| १७ | दि ओझर मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँक लि., नाशिक | २०,०००.०० |
| | एकूण | १,१०,८५८.१८ |

S. D. SATAM & CO. ★ BHANDUP MUMBAI ★ CHARTERED ACCOUNTANTS

# परिशिष्ट ४

## खाते हिशेबपत्रके व बँक प्रमाणपत्रांनुसार बँकेतील शिल्लक रक्कमेची जुळवणी

| अ.क्र. | तपशील | खाते हिशेबपत्रकांनुसार रक्कम (रु.) | बँक प्रमाणपत्रांनुसार रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक बचत खाते | १,९२,३६३.७० | २,३५,७४७.७० |
| २ | अपना सहकारी बँक बचत खाते | २,९१,७२७.७६ | ३,१४,५६२.७६ |
| ३ | यूको बँक बचत खाते | २,४३,४३६.४६ | २,९५,७८१.४६ |
| ४ | युनिटी स्मॉल फायनॅन्स बँक चालू खाते | ९२,२९,२९७.०० | ९२,२९,२९७.०० |

For S. D. SATAM & Co.
CHARTERED ACCOUNTANTS
F. R. No. 118302W

S. D. SATAM & Co. Chartered Accountants M. No. 104904 MUMBAI

Santosh D. Satam
Proprietor